**ग्लोबल वॉर्मिंगमुळे वातावरणामध्ये होत असलेल्या बदलाबाबत संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांची समिती नियुक्त करणे**

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र. ग्लोबल-२००५/प्र.क्र. ६८/तां. क. १,
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला,
मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २९ सप्टेंबर, २००८

**प्रस्तावना :** वातावरणामध्ये होत चाललेले बदल हा मुद्दा जागतिक स्तरावरील विषय आहे. जगातील सर्वच देश आपल्या सर्वांगीण विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणावर वापर करीत आहेत. जागतिक तापमान वाढीस कार्बनडाय ऑक्साईड, मिथेन, नायट्रस ऑक्साईड, क्लोरोफ्लोरो कार्बन या वायूंचा मुख्यतः समावेश आहे. विकास साधताना मानवाने पर्यावरणीय संतुलनाकडे कधी जाणीवपूर्वक तर कधी अनावधानाने दुर्लक्ष केलेले आहे. जंगलतोड, खडकांचे खणण, कोळसा उत्खनन, लोह उत्खनन, पाण्याचा निष्काळजीपणे वापर यामुळे पर्यावरण संबंधित अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. उदा. जल प्रदूषण, हवा प्रदूषण व ध्वनिप्रदूषण, आम्ल पर्जन्य, वातावरणातील ओझोनचा क्षय, हरितगृह परिणाम, अतिवृष्टी, महापूर व सुनामी या समस्या दिवसेंदिवस अतिशय जटील होत आहेत. अशा परिस्थितीत पर्यावरणाचे नुकसान न होता विकास योजना राबविणे आणि पर्यावरण संतुलनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे महत्वाचे आहे.

**शासन निर्णय :**

विधानपरिषदेच्या मार्च २००८ च्या अधिवेशनामध्ये ग्लोबल वॉर्मिंग या विषयावर चर्चा झाली तसेच मा. पंतप्रधान यांनी जून, २००८ मध्ये जागतिक तापमान वाढ या विषयावर कृती आराखडा जारी केलेला आहे, याबाबत करावयाच्या कार्यवाहीमध्ये शासनाचे विकासात्मक विभाग, जसे नगर विकास, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, कृषि व पदुम, जलसंपदा, मदत व पुनर्वसन, महसूल व वन, उद्योग, ऊर्जा व कामगार, अन्न व नागरी पुरवठा, शालेय शिक्षण व पर्यावरण इत्यादींशी संबंधित आहे. सबब, या विभगांच्या कार्यकक्षेतील प्रकल्पावर विचार करण्यासाठी खालील समिती गठन करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| मा. मुख्यमंत्री | -- | अध्यक्ष |
| मा. मंत्री, पर्यावरण | -- | सदस्य |
| मा. मंत्री, नगर विकास | -- | सदस्य |
| मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम | -- | सदस्य |
| मा. मंत्री, परिवहन | -- | सदस्य |
| मा. मंत्री, कृषि | -- | सदस्य |
| मा. मंत्री, जलसंपदा | -- | सदस्य |
| मा. मंत्री, मदत व पुनर्वसन | -- | सदस्य |
| मा. मंत्री, महसूल व वन | -- | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| मा. मंत्री, उद्योग | -- | सदस्य |
| मा. मंत्री, ऊर्जा | -- | सदस्य |
| मा. मंत्री, अन्न व नागरी पुरवठा | -- | सदस्य |
| मा. मंत्री, शालेय शिक्षण | -- | सदस्य |
| डॉ. शाम आसोलेकर, प्राध्यापक आय. आय. टी., मुंबई | -- | सदस्य (पर्यावरणतज्ञ) |
| संचालक, नॅशनल एन्व्हायर्नमेंटल रिसर्च इन्स्टिटयूट (निरी), मुंबई | -- | सदस्य (पर्यावरणतज्ञ) |
| सचिव, पर्यावरण | -- | सदस्य सचिव |

समितीची मुदत एक वर्ष असून समितीच्या बैठकीत ठरल्यानुसार संबंधित विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ग. नि. वराडे )
संचालक

प्रति

मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, परिवहन यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, कृषि यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, महसूल व वन यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, उद्योग यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, ऊर्जा यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, अन्न व नागरी पुरवठा यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव,
सचिव, पर्यावरण यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
डॉ. शाम आसोलेकर, प्राध्यापक, आय. आय. टी., मुंबई
संचालक नॅशनल एन्व्हायर्नमेंटल रिसर्च इन्स्टिटयूट (निरी), नागपूर.
अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक

प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग
प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग
प्रधान सचिव (जलसंपदा)
अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग
प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग
प्रधान सचिव (वन), महसूल व वन विभाग
प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
निवड नस्ती, तां. क. १.

-------